**MHLA**110000102020

# नि.दि.दा.क्र.११/२०२० मधील नि.२० वरील आदेश

०१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.५ ते ७ यांनी एकतर्फाचा आदेश रद्द करुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, सदर प्रतिवादींना समन्सची योग्य त्या रित्या बजावणी झालेली नाही. दरम्यानच्या काळात कोविड–१९ च्या महामारीमुळे ते न्यायालयात हजर राहु शकले नाहीत. सदर प्रतिवादी हे जाणुनबुजुन न्यायालयात गैरहजर राहलेलेले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र.५ ते ७ यांच्या विरोधात दि.०६/०२/२०२० रोजी एकतर्फा आदेश पारीत झालेला आहे जो रद्द करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.५ ते ७ यांनी कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. तसेच प्रतिवादी क्र.५ ते ७ यांना समन्सची बजावणी होवून देखील ते न्यायालयात हजर राहिलेले नाहीत. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केलेली आहे.

०३. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन स्पष्ट होते की, प्रतिवादींना समन्सची बजावणी झालेली आहे. सदरचा दावा वादीने दावा जमीनीच्या हददी कायम करण्यासाठी दाखल केलेला असल्यामुळे पक्षकारांमधील वादाचे निराकरण गुणदोषावर होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर अर्जामुळे प्रकरण निकाली निघण्यास होणारा विलंब खर्चाच्या स्वरुपात भरुन काढुन प्रतिवादीला बचाव मांडण्याची संधी देणे

न्यायोचित होणार आहे. त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब व पक्षकारामधील वादाचे स्वरुप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदरचा अर्ज प्रतिवादीवर खर्च बसवून मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आ दे श**

१. नि.क्र.२० वरील अर्ज प्रतिवादी क्र.५ ते ७ यांच्यावर रक्कम रु.५००/– खर्च बसवून मंजूर करण्यात येत आहे.

२. वर नमूद खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.५ ते ७ यांनी वादीला पुढील तारखेपर्यंत द्यावे अथवा न्यायालयात जमा करावे.

सही/—

(के.एस. सुर्यवंशी)

दि.२०.०९.२०२१.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

निलंगा.